# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

# पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई

# पाणी गुणवत्ता टिपणी

पाणी  पुरवठा व स्वच्छतेच्या क्षेत्रामध्ये सुधारित धोरण -  लोकसहभाग व मागणी आधारीत योजना राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होते. सन १९९९ -२००० सालापासून या धोरणाच्या आधारावर  पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या योजना  राज्यात राबविण्यात येत आहेत.

पाणी म्हणजे जीवन ! म्हणूनच  मानवी जीवनात स्वच्छ  व शुध्द पाण्याचे महत्व अनन्य साधारण आहे. शुद्ध व सुरक्षित पाणी पुरवठा होण्यासाठी  पाण्याची गुणवत्ता चांगली असणे गरजचे आहे.राज्यातील जनतेला शुद्ध व सुरक्षित पाणी पुरवठा करणे ही शासनाची जबाबदारी असून त्याकरिता जिल्हा परिषदा, पंचायत समित्या , ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून  करण्यात येणारी कार्यवाही अधिक परिणामकारक , निर्दोष व नियोजनबद्ध व्हावी व जनतेला शुद्ध व सुरक्षित पाणी पुरवठा व्हावाया करीता शासनाचे विविध विभाग - पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ग्रामविकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग वेगवेगळी जबाबदारी पारपाडत आहेत.

पाणी पुरवठा वितरण करणारी संस्था ही पाणी गुणवत्ता सनियंत्रणासाठी जबाबदार आहे. ७३ व  ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार शुद्ध व सुरक्षित पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी ही पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेवर टाकण्यात आली आहे. यामध्ये शुद्ध, सुरक्षित व पुरेशा प्रमाणात जनतेला पाणी उपलब्ध होईल याची दक्षता घेणे, पाण्याचे निर्जंतुकीकरण करणे, पाणी पुरवठा योजनेचा परिसर स्वच्छ ठेवणे इ. बाबी यामध्ये समाविष्ट होतात.

विविध शासन निर्णयामध्ये  पाणी गुणवत्ता सनियंत्रणाची  जबाबदारी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे देण्यात आली आहे. यामध्ये पाण्याची गुणवत्ता अजमावणे, पाणी दुषित होण्याची संभाव्य कारणे शोधून त्यावरील उपाययोजना करण्याविषयी सल्ला देणे इ. बाबींचा समावेश आहे.

व्यक्तिगत सवयी, सार्वजनिक अस्वच्छता यामुळे पिण्याचे पाणी दुषित होते त्याचप्रमाणे नळ पाणी पुरवठ्यातील दोष,देखभाल दुरुस्तीविषयी असणारी लोकांचीअनास्था, नियमित शुद्धीकरण व पाण्याची तपासणी नहोण्यामुळे पाणी दुषित होण्याची शक्यता खूपच असते आणि असे दुषित पाणी पिण्यास वापरल्याने गॅस्ट्रो, अतीसार, हगवण, विषमज्वर, कावीळ इ. जलजन्य रोग होतात.

ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रम ग्रामस्थांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेला कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात ग्रामस्थांचा प्रत्यक्ष सहभाग असावा त्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करण्यात आली आहे. ग्राम आरोग्य पाणी पुरवठा व स्वच्छता समिती आता सर्व ग्रामपंचायती मध्ये ग्राम आरोग्य, पोषण, पर्यावरण व पाणी पुरवठा व स्वच्छता समिती या नावाने कार्यरत आहे.

राज्यातील जनतेला शुद्ध व सुरक्षित पाणी पुरवठा करणे ही शासनाची जबाबदारी असून त्याकरिता जिल्हा परिषदा, पंचायत समित्या , ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून करण्यात येणारी कार्यवाही अधिक परिणामकारक, नियोजनबद्धव्हावी व जनतेला शुद्ध व सुरक्षित पाणी पुरवठा व्हावा याकरिता शासन पुढीलप्रमाणे उपाययोजना करत आहे.

- पाणी गुणवत्ता व साथरोग नियंत्रणासाठी राज्यातील सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, महानगरपालिका, नगरपालिका यांना शासनाने पाणी शुद्धीकारणासाठी लागणाऱ्या ब्लिचिंग पावडरची, सोडियम हायपोक्लोराइड, द्रवरूप क्लोरीन व इतर द्रावणानचा वापर स्थानिक गरजा लक्ष्यात घेऊन स्थानिक स्तरावरच आवश्यकतेनुसार विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून खरेदी करण्यास परवानगी देण्यात आली आहे . या द्रावणे / रसायने यांची गुणवत्ता भारतीय मानांकन संस्थेचा ( Bureau of Indian Standards) च्या निकषानुसार असावी असे बंधनकारक आहे.

- प्रतिवर्षी पावसाळ्यापूर्वी शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी व साथरोग प्रतिबंध करण्यासाठी शासनस्तरावरून आवश्यक त्या सूचना परिपत्रकान्वये सर्व जिल्हा परिषदाना निर्गमित करण्यात येतात.

- पाण्याची व ब्लिचिंग पावडरची वारंवार तपासणी करून गुणवत्ता सनियंत्रण केले जाते. स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होण्यासाठी प्रयत्न दुषित पाण्याची टक्केवारी कमी करण्याबाबत व राज्यातील जनतेस जलजन्य साथरोगा पासून परावृत्त करण्याचे सातत्याने प्रयत्न केले जातात.

उपरोक्त योजना व्यतिरिक्त लोकांमध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीकोनातून शासन प्रयत्नशील आहे.त्यानुसार राज्यात केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पाणी गुणवत्ता व सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यालाच “सुरक्षित जल अभियान ” असे नामकरण करण्यात येऊन त्याचे बोध वाक्य “सुरक्षित पाण्याची शक्ती रोगराई पासून मुक्ती” असे करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे:

- ग्रामीण भागातील सर्व पाणी स्त्रोतांचे गुणवत्ता सनियंत्रण, देखरेख , दुरुस्ती व सर्वेक्षनामध्ये लोकांचा सहभाग वाढवणे.

- ग्रामपंचायतीना या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी मध्ये सहभागी करणे व त्यांना सक्षम बनवणे.

- सोप्या पद्धतीने पाणी तपासणीच्या संचाचा वापर करून गावातल्या गावात पाण्याची तपासणी करणे.

- लाकांमध्ये स्वच्छता व सुरक्षित पाणी पुरवठ्याबाबत तसेच अशुद्ध पाण्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामा बाबत जनजागृती वाढविणे.

- पाणी पुरवठा यंत्रणेतील वेळोवेळी उद्भवणारे दोष वा दुरुस्त्या लोकसहभागातून करणे हे प्रमुख उद्दिष्टे आहेत.

या कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या बाबी :-

- प्रशिक्षण कार्यक्रम -

  या कार्यक्रमांतर्गत ग्रामपातळी पर्यंत लोकांना पिण्याच्या पाण्याचे गुणवत्ता देखरेख व सनियंत्रण यशस्वीरीत्या कश्याप्रकारे करावे या बाबत माहिती देण्यासाठी राज्यस्तर/ जिल्हास्तर/ तालुकास्तर या तीन स्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जातो.

  राज्यातील जिल्हा पाणी गुणवत्ता कक्षाअंतर्गत ग्रामपंचायतस्तरावर विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. सन २०१४-१5 या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा स्तरीय २०६, तालुका स्तरीय 16292 व ग्रामपंचायत स्तरावरील ६9039 पाणी पुरवठा व स्वच्छता कामाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले.

  पावसाळ्या दरम्यान वाढणाऱ्या साथरोगांवर नियंत्रण आणण्यासाठी तसेच पाणी गुणवत्ता विषयाबाबत साक्षरता वाढण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये दि. २५ मे ते १५ जून २०१५ रोजी दरम्यान “साथरोग मुक्त पाणी गुणवत्ता जनजागृती मोहीम” चालू आहे. सदर मोहीम ही जिल्हास्तर, तालुकास्तर व ग्रामपंचायत स्तर आश्या तीन टप्प्यामध्ये होणार आहे.

- फिल्ड टेस्ट किट्स चे वाटप -

  या कार्यक्रमांतर्गत क्लोरोस्कोप, अनुजैविक व रासायनिक फिल्ड टेस्ट किट्स खरेदी करून सर्व ग्रामपंचायतीना वितरीत करण्यात आल्या आहेत. इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना प्रयोगाचा भाग म्हणून अनुजैविक फिल्ड टेस्ट कीट सर्व शाळांना पुरविण्यात आल्या आहेत.

  आदिवाशी आश्रमशाळा व वसतिगृहे यांना देखील पाणी तपासणीसाठी फिल्ड टेस्ट किट्स पुरवण्यात आल्या आहेत.सन २०१2-१३ या वर्ष्यामध्ये फिल्ड टेस्ट किट्सचे वितरण खालीलप्रमाणे

| रासायनिक फिल्ड टेस्ट किट्स (ग्रामपंचायत स्तर) | अनुजैविक फिल्ड टेस्ट किट्स ( ग्रामपंचायत स्तर व आदिवाशी आश्रमशाळा व वसतिगृहे) | क्लोरोस्कोप ( ग्रामपंचायत स्तर) |
|---|---|---|
| ४००० | १०,६४,००० | २८,००० |

- स्वच्छता सर्वेक्षण - (शासन निर्णय क्र.डब्लूक्यूएम २०१०/प्र.क्र.१९०/पापु१२/दि.२९.08.2013)

  पाणी गुणवत्ता व सनियंत्रण कार्यक्रमामध्ये स्वच्छता सेर्वेक्षनाचे अनन्य साधारण महत्व आहे. स्वच्छता सेर्वेक्षनातून स्त्रोताभोवतीचा परिसर, पाणी पुरवठा संरचना व व्यवस्थापनातील जे काही दोष आढळून येतात त्यांचे निराकरण वेळेत करता येऊन संभाव्य साथीस प्रतिबंध करता येतो.

  आरोग्य विभागामार्फत ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात आलेल्या लाल कार्ड म्हणजे संपूर्ण ग्रामपंचायत परिसर अथवा सर्व स्त्रोतांचा पाणी साठा दुषित झाला आहे असे ठरवण्यात येते. असुरक्षिततेच्या या

कारणाकडे लक्ष देऊन ते दूर करण्यात येते. लाल कार्ड हे त्या ग्रामपंचायतीस संभाव्य साथरोगांची सूचना देत असते.

सन २०१३-१४ या वर्ष्यामधील स्वच्छता सर्वेक्षण आहवाल खालीलप्रमाणे

मान्सून पुर्व ( एप्रिल २०१३)

| तीव्र जोखीम स्त्रोतांची संख्या | मध्यम जोखीम स्त्रोतांची संख्या | अल्प जोखीम स्त्रोतांची संख्या | लाल कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या | पिवळे कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या | हिरवे कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ४,३९७ | ४८,०१० | १,२६,२२७ | ७४२ | ७,८७९ | १७,९८९ |

मान्सून नंतर ( नोव्हेंबर २०१३)

| तीव्र जोखीम स्त्रोतांची संख्या | मध्यम जोखीम स्त्रोतांची संख्या | अल्प जोखीम स्त्रोतांची संख्या | लाल कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या | पिवळे कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या | हिरवे कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ३,४२५ | ५२,५३२ | १,३३,९१७ | ३९७ | ७,४९३ | १९,१४५ |

मान्सून पुर्व ( एप्रिल २०१४)

| तीव्र जोखीम स्त्रोतांची संख्या | मध्यम जोखीम स्त्रोतांची संख्या | अल्प जोखीम स्त्रोतांची संख्या | लाल कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या | पिवळे कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या | हिरवे कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| २,३२४ | ४८,१९४ | १४६४५५ | ३०९ | ७,१९५ | २०१३१ |

मान्सून नंतर ( ऑक्टोबर २०१४)

| तीव्र जोखीम स्त्रोतांची संख्या | मध्यम जोखीम स्त्रोतांची संख्या | अल्प जोखीम स्त्रोतांची संख्या | लाल कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या | पिवळे कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या | हिरवे कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 2231 | 34965 | 116853 | 167 | 4950 | 15926 |

मान्सून पुर्व ( एप्रिल २०१५)

| तीव्र जोखीम स्त्रोतांची संख्या | मध्यम जोखीम स्त्रोतांची संख्या | अल्प जोखीम स्त्रोतांची संख्या | लाल कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या | पिवळे कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या | हिरवे कार्ड मिळालेल्या ग्रा. पं. ची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| सदर सर्वेक्षानाचे अहवाल अद्याप प्राप्त झालेले नाहीत. | | | | | |

स्वच्छता सर्वेक्षनाचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसात तालुकास्तरावर गट विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व तालुका आरोग्य अधिकारी, उप अभियंता (ग्रा.पा.पु.) यांच्या तालुकास्तरीय समितीत लाल व पिवळे कार्ड प्राप्त झालेल्या ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांचा आढावा घेऊन त्रुटी पूर्ण करण्याबाबत संबधितांना मुदत देण्यात येते.

- प्रयोगशाळांचे बळकटीकरण व तपासणी -

राज्यातील जिल्ह्याच्या आकारमान, स्त्रोत संख्या यांचा विचार करून १३8 तालुकास्तरीय प्रयोगशाळांचे बळकटीकरण करून त्यांना आता उपविभागीय प्रयोगशाळा संबोधण्यात येत आहे. दि. ०१.०४.२०१५ पासून सार्वजनिक आरोग्य विभागाधीनिस्त असलेल्या १३८ प्रयोगशाळांचे सनियंत्रण पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांच्याकडे देण्यात आले आहे. उपविभागीय प्रयोशाळांमध्ये जिल्हा प्रयोगशाळेप्रमाणे पाण्यातील अनुजैविक, रासायनिक घटकांची तपासणी व टीसीएल पावडर ची तपासणीची सोय करण्यात आली आहे.

प्रयोग शाळांची माहिती खालीलप्रमाणे

| अ.क्र. | प्रयोगशाळा स्तर | भू.स.व वि.यं |
|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय | 1* |
| २ | विभागीय | 6 |
| ३ | जिल्हास्तरीय | १०+१८* |
| ४ | उप विभागीय | 1३८+१०* |
| | एकूण | १५४+२९* |
| | *प्रयोगशाळा स्थापनेचे काम प्रगतीपथावर आहे. | |

रासायनिक तपासणी अहवाल- मान्सून पूर्व ( मार्च २०१२ ते मे २०१३ )

| Total no. of Sources | Sample Collected for testing | Sample Test | Above Permissible for | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | TDS | % | NO3 | % | Fe | % | F | % |
| 261839 | 172061 | 172061 | 3075 | 2.0 | 42618 | 25.0 | 8633 | 5.00 | 9233 | 5.00 |

रासायनिक तपासणी अहवाल- मान्सून पूर्व ( जानेवारी २०१४ ते मे २०१४ )

| Total no. of Sources | Sample Collected for testing | Sample Test | Above Permissible for | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | TDS | % | NO3 | % | Fe | % | F | % |
| 258045 | 150731 | 150731 | 2011 | 1.57 | 45886 | 32.39 | 14180 | 8.75 | 5099 | 2.72 |

रासायनिक तपासणी अहवाल- मान्सून नंतर ( 15 सप्टेंबर २०१४ ते 28 फेब्रुवारी २०15 )

| Total no. of Sources | Sample Collected for testing | Sample Test | Above Permissible for | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | TDS | % | NO3 | % | Fe | % | F | % |
| 251032 | 170841 | 170841 | 2033 | 1 | 53474 | 31 | 8468 | 5 | 4300 | 3 |

सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्रोत सांकेतांक

(शासन निर्णय क्र.डब्लूक्यूएम २०१३/प्र.क्र.०2/पापु१२/दि.१२ मार्च २०१३)

राज्य शासनाने गावे व वाडी / वस्त्या यामध्ये असलेले सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची माहिती एकत्र व्हावी व संपूर्ण माहिती प्रणाली मध्ये सुसूत्रता येण्यासाठी स्रोतांची संपूर्ण माहिती त्या गावाच्या जनगणना क्रमांकाशी जोडण्यासंबधिचा (स्त्रोत सांकेतांक) शासन निर्णय क्र. डब्लूक्युएम/२०१३/प्र.क्र.०२/पापु १२ दिनांक १२.०३.२०१३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील अहमदनगर, भंडारा, धुळे, हिंगोली,जळगाव, जालना, कोल्हापूर, नांदेड,नाशिक परभणी, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा,सांगली,सिंधुदुर्ग, सोलापूर,उस्मानाबाद औरंगाबाद व नंदुरबार या २० जिल्ह्यातील स्त्रोतांना स्त्रोत सांकेतांक देण्याचे काम पूर्ण झाले असून उर्वरित १४ जिल्ह्याचे काम प्रगती पथावर आहे.

सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे **Asset Mapping**

राज्यातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे व पाणी पुरवठा योजनांच्या उपांगाचे Asset Mapping करण्यात येणार आहे. सदर Asset Mapping च्या संदर्भातील Mobile Application, Software ,Web Portal, Data Validation & Uploading ही कामे MRSAC, Nagpur यांच्या मार्फत करण्यात येणार आहेत. तर स्त्रोतांचे सर्वेक्षण करणे, स्त्रोतांचे व पाणी पुरवठा योजनांच्या उपांगाचे अक्षांश व रेखांशघेणे, स्रोतांचे अणुजैविक व रासायनिक तपासणीसाठी नमुने घेणे ही कामे ADCC , Nagpurया कंपनी मार्फत करण्यात येणार आहेत.

Heavy Metals/ Toxic Metals / Pesticides/ Fertilizers ची पिण्याच्या पाण्यातील तपासणी

(शासन निर्णय क्र.डब्लूक्यूएम २०१4/प्र.क्र.०1/पापु१२/दि.३० मार्च २०१५)

नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, सिंधुदुर्ग व कोल्हापूर या खनिज संपत्ती असलेल्या १२ जिल्ह्यातील Heavy Metals/ Toxic Metals / Pesticides/ Fertilizers ची पिण्याच्या पाण्यातील तपासणी राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थान (नीरी),नागपूर यांच्या मार्फत करण्यात येणार आहे. वरील १२ जिल्ह्यांपैकी पहिल्या टप्प्यातील अमरावती, अकोला व नागपूर या तीन जिल्ह्यात तपासणीच्या कामास सुरुवात झाली आहे.

- **RFD Target**

| Sr. No | Particulars | 2013-2014 | | | 2014-2015 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Target | Ach. | % Ach. | Target | Ach. | % Ach. |
| | 1 | 2 | 3 | 4 | 6 | | |
| 1 | No. of persons trained to monitor WQ using FTKs | 56000 | 97058 | 100 % | 56000 | 69031 | 100 |
| 2 | Number of water quality tests done in Laboratories | 845823 | 538348 | 64 % | 600000 | 602986 | 100 |
| 3 | No. of Hab. where at least one source is tested in lab. | 50000 | 67287 | 100 % | 50000 | 68237 | 100 |
| 4 | Number of water quality tests done with FTKs | 563882 | 314327 | 58 % | 300000 | 4554 | 2 |
| 5 | Number of Sub-district level laboratories set up | 14 | 4 | 29 % | 18 | 17 | 94 |

## WQMSP - Financial Progress 2014-2015

| Details | Opening Balance (01/04/2013) | Allocation | Release | Total Aval. Fund | Expenditure | | Closing Balance |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | in Cr. | % | |
| as per Cash Book | 6.07 | 29.13 | 24.66 | 30.73 | 16.10 | 53 | 14.63 |